# CRITERIA VII

**7.1.8: Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and other diversities**

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन

लातूर दि.२२ : माजी राष्ट्रपती भारतरत्न स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्म दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधुन वाचकांना वाचनाची आवड निर्माण व्हावी. ग्रंथालयीन ग्रंथांची ओळख व्हावी या उद्देशाने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय लातूर येथे ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन दि. २० ऑक्टोबर २०२१ ते २२ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत करण्यात आले.

या ग्रंथ प्रदर्शनामध्ये डॉ. ए.पी.जी. अब्दुल कलाम यांनी लिहिलेले त्यांच्यावरती लिहिलेले तसेच अनेक नामवंत लेखकांच्या नामवंत ग्रंथाचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे जिल्हा माहिती अधिकारी श्री.युवराज पाटील यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन व फित कापून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी ओ. सुनिल जगभारे, कार्यालयाचे श्री. सोपान मुंडे, हरिश्चंद्र डेंगळे,हीरालाल पाटील व वाचक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. या प्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी वाचनाचे महत्व विषद करुन विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

# आझाद महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



औसा : येथील आझाद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमत् महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना प्राचार्य डॉ.ई.यू मासूमदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ संजय चव्हाण, प्रा गोविंद टिंगरे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक ग्रामीण जनतेचे मुखपत्र
# गुरुधर्म
संस्थापक : नारायणराव हंचाटे (नाना)
Email :- dailygurudharm.ausa@gmail.com
शनिवार दिनांक ०६ मार्च २०२१ लातूर-औसा पोस्टल रजि. नं. L2/RNP/OMD-15/2021-2023

## मानवी मूल्ये मातृभाषेतूनच रुजली जातात : प्रा. झाडे

औसा, दि. ५ : मराठी ही आपली माय बोली असून मानवी मूल्ये रुजण्यासाठी मराठी माणसासाठी मराठी हे एकमेव माध्यम आहे,आणि ती मायबोली आहे म्हणून आपल्या मनात जे विचार येतात ते मराठीमधूनच येतात असे प्रतिपादन प्रा. मल्लिकार्जुन झाडे यांनी येथील आझाद महाविद्यालयात आयोजीत मराठी भाषा गौरव दिन या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून बोलताना केले. २७ फेब्रुवारी हा कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस सर्वत्र मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो,यानिमित्ताने आझाद महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य टी. ए. जहागीरदार हे होते.

यावेळी प्राचार्य आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, अनेक संतांनी आपले लिखाण मराठीत केले आहे तसेच अनेक लेखकांचे दर्जेदार साहित्य लिखाण आपल्याला मराठी भाषेत आढळते. मराठी भाषा ही खूप जूनी असून ती बोलण्यास व समजण्यास सहज सोपी असल्याचे सांगितले. याप्रसंगी डोंगरे रोहिणी हिने मराठी गीत व काझी कासीम या विद्यार्थ्याने मराठी म्हणजे मातीतून उगवलेला अंकुर असे आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक करताना प्रा. दुष्यंत शिंदे यांनी मराठी भाषेचा उगम,विकास, वर्तमान सांगून मराठी भाषिकांनी जाणीवपूर्वक मायबोलीचा वापर करण्याचे आवाहन केले. शेवटी आभार प्रा डॉ. बिभीषण कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी सामाजिक अंतर राखून उपस्थित होते.

दैनिक ग्रामीण जनतेचे मुखपत्र

# गुरुधर्म


संस्थापक : नारायणराव हंचाटे (नाना)

Email :- dailygurudharm.ausa@gmail.com    पोरटल रजि. नं. L2/RNP/OMD-15/2021-2023

. ११९ वा    गुरुवार, दिनांक १६ सप्टेंबर २०२१    आर. एन. आय. ५७११४/८२    www.dailygu

## आझाद महाविद्यालयात नॅकवरील गुणवत्ता विकास कार्यक्रम संपन्न

औसा, दि. १५ : येथील आझाद महाविद्यालयात १४ सप्टेंबर रोजी नॅक या विषयावर महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे एक दिवसीय व्यावसायिक गुणवत्ता विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.अय्युब शेख (खेड कॉलेज आयक्यूएसी को ऑर्डिनेटर, क्लस्टर इंडिया मेंबर) हे होते. त्यांनी नॅक विषयी एस एस आर वर सखोल मार्गदर्शन केले.





अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. ई. यू. मासुमदार यांनी महाविद्यालयाचा विकास आराखडा सादर केला व नॅक मधील सद्य परिस्थिती काय आहे हे सांगितले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य टी. ए. जहागीरदार तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थितीत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मेहराज बरोटे , कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. निसार सय्यद तर आभार प्रदर्शन डॉ.मन्सूर इनामदार यांनी मानले.

## आझादमध्ये राष्ट्रीय हिंदी दिवसानिमित्त एकदिवसीय परिसंवाद संपन्न

औसा, दि. १५ : येथील आझाद महाविद्यालयात १४ सप्टेंबर या राष्ट्रीय हिंदी दिवसानिमित्त देश विदेश में हिंदी भाषा की स्थितीया विषयावर




मंगळवारी आयोजित परिसंवाद यशस्वी संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून उपप्राचार्य डॉ.अल्लाबक्ष जमादार

उपस्थितीताना दिली. तर प्रा डॉ. कांबळे यांनी हिंदी भाषेचे वैश्विक स्वरूप यावर भाष्य केले. प्राचार्य डॉ. मासूमदार यांनी आपल्या ... हिंदी भाषेतील

हिंदी भाषेसमोर भविष्यात असणारी संकटे वअडचणी सर्वांना अवगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मजहर कोतवाल यांनी तर आभार प्रा. महेबुब

दैनिक ग्रामीण जनतेचे मुखपत्र

# गुरुधर्म

संस्थापक : नारायणराव हंचाटे (नाना)

Email :- dailygurudharm.ausa@gmail.com

पोस्टल रजि. नं. L2/RNP/OMD-15/2021-2023

क्रं. १२७ वा सोमवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२१ आर. एन. आय. ५७११५/८२ www.dailyg

# आझाद महाविद्यालयातील सात दिवसीय योगा शिबिराची सांगता

औसा, दि. २६ : येथील आझाद महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि भौतिकशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ सप्टेंबर ते २१सप्टेंबर या कालावधीत सात दिवसीय ऑनलाईन योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्याची यशस्वी सांगता झाली. या योग शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून पतंजली योगपीठ हरिद्वारचे अधिकृत प्रशिक्षक प्रा डॉ. ब्रिजमोहन दायमा व प्रा डॉ. सारिका दायमा हे लाभले होते. प्रथमतःयोग प्रशिक्षण शिबिराचे उद् घाटन मुख्य संयोजक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ई.यू.मासुमदार यांच्या हस्ते झाले. या योग शिबिरात नित्यनियमाने दररोज सकाळी ६:३० ते ७:३० या वेळेत प्राणायाम, अनुलोम विलोम यासारखे योगातील अनेक प्रकारांचे प्रशिक्षण उपस्थितांना देण्यात आले.

या शिबिराच्या समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.ई.यु.मासुमदार यांनी योगा हा मानवाच्या सर्वांगीण आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त असून सध्याच्या कोरोना काळात प्रत्येकाने योगासने व प्राणायाम करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. शिबिराचे सूत्रसंचालन प्रा डॉ.बी.डी.इंगळे,प्रा डॉ.एम.एम इनामदार यांनी केले. या सात दिवसीय योगा प्रशिक्षण शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य तन्वीर जहागीरदार, प्रा डॉ.आदित्य माने,प्रा डॉ.मेहराज बरोटे,प्रा डॉ.दिलीप क्षीरसागर, प्रा.मजहर कोतवाल,प्रा डॉ. निसार सय्यद, प्रा.वैजनाथ जावळे, यांनी परिश्रम घेतले.

# प्रतिव्यवहार

PRATIVAHIR E-mail: dainikprativyvhar@gmail.com फॅक्स : ०२३८२/२५४२५१

…२/आरएनपी/ओएमडी/१२१/२०१८-२० R.N.I 70813/98 कार्यकारी संपादक दिलीप मुनाळे मो. ९४२११११६६८३

…-दैनिक वर्ष : ३४ वे अंक : २२० वा गुरुवार दि. २३ सप्टेंबर २०२१ किं.२ रु. पृष्ठे : ४




## आझाद महाविद्यालयातील सात दिवसीय योगा शिबिराची सांगता

औसा : येथील आझाद महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि भौतिकशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ सप्टेंबर ते २१सप्टेंबर या कालावधीत सात दिवसीय ऑनलाईन योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्याची यशस्वी सांगता झाली. या योग शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून पतंजली योगपीठ हरिद्वारचे अधिकृत प्रशिक्षक प्रा डॉ. ब्रिजमोहन दायमा व प्रा डॉ. सारिका दायमा हे लाभले होते. प्रथमतःयोग प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन मुख्य संयोजक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ई.यू.मासुमदार यांच्या हस्ते झाले. या योग शिबिरात नित्यनियमाने दररोज सकाळी ६:३० ते ७:३० या वेळेत प्राणायाम, अनुलोम विलोम यासारखे योगातील अनेक प्रकाराचे प्रशिक्षण उपस्थितांना देण्यात आले.

या शिबिराच्या समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.ई.यु.मासुमदार यांनी योगा हा मानवाच्या सर्वांगीण आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त असून सध्याच्या कोरोना काळात प्रत्येकाने योगासने व प्राणायाम करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. शिबिराचे सूत्रसंचालन प्रा डॉ.बी.डी.इंगळे, प्रा डॉ.एम.एम इनामदार यांनी केले. .या सात दिवसीय योगा प्रशिक्षण शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य तन्वीर जहागीरदार, प्रा डॉ.आदित्य माने,प्रा डॉ.मेहराज बरोटे,प्रा डॉ.दिलीप क्षीरसागर, प्रा.मजहर कोतवाल,प्रा डॉ. निसार सय्यद, प्रा.वैजनाथ जावळे, यांनी परिश्रम घेतले.या ऑनलाईन योग शिबिरासाठी दररोज १०० पेक्षा जास्त जणांची उपस्थिती होती.